# डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी यांना 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार

**कोल्हापूर :** संजय घोडावत इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. व्ही.



व्ही. कार्जिनी यांना आय.एस.टी.ई. (नवी दिल्ली) संस्थेकडून राष्ट्रीयपातळीवरचा 'भारतीय विद्याभवन सर्वोत्कृष्ट इंजिनिअरिंग प्राचार्य' पुरस्कार जाहीर झाला आहे. इंजिनिअरिंग कॉलेज क्षेत्रातील योगदानाबद्दल हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज (वारणानगर) येथे होणाऱ्या आय.एस.टी.ई.च्या ४३ व्या राष्ट्रीय शिक्षक परिषदेत डॉ. कार्जिनी यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. गेल्या तीन वर्षांपासून ते घोडावत इन्स्टिट्यूटचे संचालक म्हणून कार्यरत आहेत.